दैनिक

MAHILA SANVAD

# महिला संवाद

आवृत्ती : पुणे PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा

संपादक : ज्योती मधुकर आडेकर | कार्यकारी संपादक : विद्या जाधव | उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड

**महिला प्रतिनिधी पाहिजेत**

जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी महिला प्रतिनिधी पाहिजेत.

सामाजिक, शैक्षणिक, धामिर्क, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्तयावर संपर्क साधावा.

महिला संवाद

कार्यालय
दैनिक महिला संवाद,
गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना. 9168567111

PUNE : Volume No. 1, Issue No. 291, Marathi Daily Sunday, Date - 31 May 2026 Price 2 Rupees, Pages - 4

पुणे अवृत्ती | वर्ष १ ले | अंक २९१ वा | मराठी दैनिक | रविवार दि. ३१ मे २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४

**पाहिजेत**

महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.

अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३

संपर्क - 9168567111

वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा

# मुंबई उडवण्याचा कट उधळला



**मुंबई । प्रतिनिधी**

देशाच्या राजधानीसह मुंबई आणि पंजाबमध्ये मोठा दहशतवादी हल्ला घडवून आणण्याचा कट उधळून लावण्यात सुरक्षा यंत्रणांना मोठे यश आले आहे. दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने (स्पेशल सेल) पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय आणि अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमच्या गुन्हेगारी नेटवर्कशी संबंधित नऊ संशयितांना अटक केली आहे. या कारवाईदरम्यान आरोपींकडून शस्त्रे, हँड ग्रेनेड, स्फोटके आणि इतर घातक साहित्य जप्त करण्यात आले असून, देशातील अनेक संवेदनशील ठिकाणांवर मोठ्या प्रमाणात दहशतवादी हल्ले घडवण्याचा त्यांचा कट असल्याचे तपासात समोर आले आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेले आरोपी दिल्ली, मुंबई आणि पंजाब येथील असून त्यामध्ये काही नेपाळी नागरिकांचाही समावेश आहे. हे संपूर्ण मॉड्यूल पाकिस्तानमधील सूत्रधारांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत होते. दिल्ली आणि मुंबईतील प्रमुख धार्मिक स्थळे, सरकारी कार्यालये, मंत्रालये, सुरक्षा दलांच्या इमारती तसेच इतर महत्त्वाच्या ठिकाणांना लक्ष्य करण्याची तयारी सुरू होती. या कटासाठी निधी, शस्त्रास्त्रांची उपलब्धता आणि स्थानिक मदत यांचे जाळेही उभारण्यात आले होते.

तपास यंत्रणांच्या मते, हे दहशतवादी मॉड्यूल अनेक महिन्यांपासून सक्रिय होते. आरोपी सोशल मीडिया, एन्क्रिप्टेड ॲप्स आणि विविध गुप्त माध्यमांतून पाकिस्तानस्थित हँडलर्सच्या संपर्कात होते. त्यांना हल्ल्याचे प्रशिक्षण, आर्थिक मदत आणि लॉजिस्टिक सपोर्ट पुरवला जात असल्याची माहिती समोर आली आहे. आता दिल्ली पोलीस या नेटवर्कच्या निधीचे स्रोत, भरती प्रक्रिया आणि देशभरातील संपर्कांचे धागेदोरे शोधत आहेत.

दरम्यान, उत्तर प्रदेश दहशतवादविरोधी पथक (एटीएस) आणि विशेष कृती दलाने (एसटीएफ) देखील मोठी कारवाई करत पाकिस्तानी दहशतवादी संघटनांशी संबंधित चार संशयितांना अटक केली आहे. हे आरोपी भाजप कार्यालये, रुग्णालये, शाळा आणि इतर संवेदनशील ठिकाणी बॉम्बस्फोट घडवण्याच्या तयारीत असल्याची माहिती तपासातून समोर आली आहे. त्यांच्याकडूनही महत्त्वाचे पुरावे जप्त करण्यात आले आहेत.

याशिवाय पंजाब पोलिसांच्या प्रतिगुप्तचर विभागाने आयएसआय समर्थित दहशतवादी नेटवर्कचा पर्दाफाश करत तीन आरोपींना अटक केली आहे. हे आरोपी देशातील विविध भागांमध्ये स्फोट घडवून भीतीचे वातावरण निर्माण करण्याच्या कटात सहभागी असल्याचा आरोप आहे. पंजाब, उत्तर प्रदेश आणि दिल्लीतील कारवाया एकमेकांशी संबंधित असल्याचा संशय सुरक्षा यंत्रणांनी व्यक्त केला आहे.

देशातील वाढत्या दहशतवादी हालचालींच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आणि राज्य सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या असून, विविध राज्यांमध्ये विशेष शोधमोहीम राबवली जात आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींची कसून चौकशी सुरू असून, त्यांच्या संपर्कातील इतर व्यक्तींचाही शोध घेतला जात आहे. या कारवाईमुळे देशात मोठा दहशतवादी हल्ला टळल्याचे मानले जात आहे.

सुरक्षा यंत्रणांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आणि कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन केले आहे. या प्रकरणाचा तपास विविध केंद्रीय तपास यंत्रणांच्या मदतीने अधिक व्यापक पद्धतीने सुरू आहे.

## तुकाराम मुंढेंचा पहिलाच मोठा दणका; राज्यभर धाडी, लाखोंचा साठा जप्त



**पुणे । प्रतिनिधी**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात विषारी गावठी दारूचे सेवन केल्यामुळे तब्बल २२ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. या भीषण 'मृत्यू तांडवा'नंतर संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली असतानाच, अन्न व औषध प्रशासनाने या प्रकरणाचे भिवंडी कनेक्शन शोधून काढत एक मोठी कारवाई केली. एफडीएचे धडाकेबाज आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या आदेशानंतर भिवंडीत मिथेनॉलचा मोठा साठा जप्त करण्यात आला आहे.

पुण्यात झालेल्या मृत्यूस कारणीभूत ठरलेली विषारी दारू बनवण्यासाठी ज्या मुख्य केमिकलचा वापर करण्यात आला होता, त्याचा पुरवठा भिवंडीतून झाल्याचे तपासात निष्पन्न झालं. त्यानुसार, एफडीएच्या विशेष पथकानं भिवंडी परिसरातील 'मे. रेक्स इंटरनॅशनल' कंपनीच्या गोदामावर अचानक धडक छापा टाकला.

या कारवाईत मानवी जिवासाठी अत्यंत घातक असलेल्या 'मिथेनॉल' या विषारी रसायनाचा सुमारे ५,९२९ किलोग्रॅमचा प्रचंड मोठा बेकायदेशीर साठा जप्त करण्यात आला आहे.

पुण्यात विकल्या गेलेल्या दारूच्या भेसळीसाठी मुख्य रसायन याच कंपनीकडून पुरवण्यात आलं होतं. अत्यंत धक्कादायक बाब म्हणजे, या अत्यंत विषारी आणि घातक द्रव्याची कोणतीही अधिकृत खरेदी-विक्रीची नोंद किंवा साठा कंपनीच्या नोंदवहीत उपलब्ध नव्हती.

## थोडक्यात...

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरणच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय टास्क फोर्स गठीत - मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये चार वर्षीय पदवी अभ्यासक्रम, केडेमिक बँक ऑफ क्रेडिट्स (एबीसी), मेजर-मायनर पद्धती, इंटर्नशिप, इंडियन नॉलेज सिस्टिम (आयकेएस), तसेच कौशल्याधारित शिक्षणाची अंमलबजावणी सुरू आहे. या प्रक्रियेदरम्यान विविध शैक्षणिक, प्रशासकीय व तांत्रिक बाबींमध्ये एकसमान मार्गदर्शनाची आवश्यकता लक्षात घेऊन विशेष टास्क फोर्स स्थापन करण्यात आला आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी दिली.

या टास्क फोर्सच्या अध्यक्षपदी प्रा. डॉ. नितीन करमळकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच विविध विद्यापीठांचे कुलगुरू, उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण संचालक आणि शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्यांचा समावेश या समितीत करण्यात आला आहे. टास्क फोर्समार्फत चार वर्षीय पदवी अभ्यासक्रमातील चौथ्या वर्षाची रचना, ओजेटी/इंटर्नशिप संदर्भातील कार्यपद्धती, क्रेडिट ट्रान्सफर, मल्टीपल एंट्री-एक्झिट, मायग्रेशन, युनिफॉर्म केडेमिक कॅलेंडर आयकेएस अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांच्या अडचणींसाठी मदत कक्ष, तसेच शिक्षक प्रशिक्षण यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर धोरणात्मक मार्गदर्शन करण्यात येणार आहे. याशिवाय, राज्यातील सर्व विद्यापीठे आणि स्वायत्त महाविद्यालयांमधील एनईपी अंमलबजावणीचा नियमित आढावा घेऊन आवश्यक त्या शिफारशी शासनास सादर करण्यात येणार आहेत. ही समिती दर तीन महिन्यांनी प्रगती अहवाल सादर करणार आहे. महाराष्ट्रातील उच्च शिक्षण अधिक गुणवत्तापूर्ण, कौशल्याधारित, संशोधनाभिमुख आणि विद्यार्थी-केंद्रित करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे, असेही मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी सांगितले.

### शिवशक्ती मैदानावर १४ वर्षीय मुलगा ठार

**बार्शी । प्रतिनिधी**

बार्शी शहरातील शिवशक्ती मैदानावर आज शनिवारी सकाळी घडलेल्या एका दुर्दैवी अपघातात १४ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याने संपूर्ण शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे. आरव योगीराज चौधरी (वय १४, रा. सुभाष नगर, बार्शी) असे मृत मुलाचे नाव आहे. येथील शिवशक्ती मैदानावर दररोज सकाळी व संध्याकाळी शेकडो विद्यार्थी व्यायाम, धावणे तसेच विविध खेळांसाठी येत असतात. आज सकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास मैदानाची देखभाल सुरू असताना ही हृदयद्रावक घटना घडली. प्राथमिक माहितीनुसार, मैदान सपाट करण्यासाठी वापरण्यात येणारा दगडी रोलर मैदानावर चालविला जात होता. यावेळी खेळण्यासाठी आलेला वीरेन चौधरी हा रोलरच्या खाली आल्याने गंभीर जखमी झाला. अपघातानंतर उपस्थितांनी त्याला तातडीने डॉ. जगदाळे मामा रुग्णालयात दाखल केले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी उपचारापूर्वीच त्याला मृत घोषित केले.

## जनगणना प्रक्रियेस नागरिकांचे सहकार्य आवश्यक : आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी



**पिंपरी । प्रतिनिधी**

अ 'जनगणना २०२७' अंतर्गत सुरू असलेली 'घरसूचीकरण व घरगणना' प्रक्रिया वेळेत आणि प्रभावीपणे पूर्ण होण्यासाठी नागरिकांनी प्रगणकांना आवश्यक सहकार्य करावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.

महापालिका क्षेत्रात १६ मेपासून प्रगणकांमार्फत घरसूचीकरण आणि घरगणना प्रक्रिया सुरू असून, स्व-गणना माध्यमातून नागरिकांनी भरलेल्या माहितीची पडताळणी आणि अंतिम नोंदणी सध्या केली जात आहे. १ ते १५ मे २०२६ या कालावधीत स्व-गणना पूर्ण केलेल्या नागरिकांनी त्यांना प्राप्त झालेला स्व-गणना ओळख क्रमांक (डए खऊ) प्रगणकांना उपलब्ध करून द्यावा, असे डॉ. सूर्यवंशी म्हणाले.

स्व-गणना ओळखक्रमांक उपलब्ध झाल्यानंतरच संबंधित घराची जनगणना प्रक्रिया अंतिम स्वरूपात पूर्ण होऊ शकते. ज्या नागरिकांनी अद्याप स्व-गणना केलेली नाही, त्यांची माहिती प्रगणकांकडून प्रत्यक्ष भेटीद्वारे नोंदविण्यात येत असून ही प्रक्रिया १४ जून २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे.

जनगणना कायदा, १९४८ अंतर्गत राबविण्यात येणारी जनगणना ही राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाची प्रक्रिया असून, विकास नियोजनासाठी अचूक आणि विश्वासार्ह माहिती संकलनाचा हा आधार मानला जातो. शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा आणि नागरी सेवांच्या प्रभावी नियोजनासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे पिंपरी चिंचवड महापालिकेचे उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी सांगितले.

जनगणना ही शहराच्या विकास नियोजनाचा महत्त्वाचा आधार असून नागरिकांनी अधिकृत प्रगणकांना सकारात्मक प्रतिसाद द्यावा तसेच, प्रगणकांकडून विचारण्यात येणारी माहिती वेळेत व अचूकपणे उपलब्ध करून देत नागरिकांनी 'जनगणना २०२७' प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी यावेळी केले.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीपूर्ती निमित्त रविवार ३१ मे रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीपूर्ती निमित्त विचार प्रबोधन पर्व या विशेष उपक्रमाचे आयोजन मोरवाडी चौक, पिंपरी व नटसम्राट निळू फुले रंगमंदिर, सांगवी येथे करण्यात आले आहे.

रविवार ३१ मे रोजी विविध सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रबोधन पर्वाची सुरुवात रविवार ३१ मे २०२६ रोजी सकाळी १०.३० मिनिटांनी महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने होणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे व्यापक कार्य व प्रेरणादायी इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे हे देखील उपस्थित असणार आहेत.

या विचार प्रबोधन पर्वाअंतर्गत रविवार ३१ मे २०२६ रोजी महाराष्ट्राची प्राचीन संस्कृतीचे दर्शन घडविणारा भव्य सेटवरील 'सुवर्ण महाराष्ट्राचा लोकोत्सव' हा कार्यक्रम होणार आहे. यामध्ये कोल्हापूर येथील ७५ कलाकार आपल्या सहकाऱ्यांसोबत धनगरीनृत्य, भूपाळी, वासुदेव. पिंगळा, वाघ्या मुरळी, शाहिरी पोवाडे, आदिवासी, डोंबारी अशा विविध व्यक्तीछटा सदर करणार आहेत. या कार्यक्रमात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्वाभिमानी व आदर्श वाटचालीचे दर्शन घडणार आहे. याशिवाय विविध सांस्कृतिक कार्यक्रम देखील होणार आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विचार प्रबोधन पर्वात महापालिकेतर्फे आयोजित करण्यात करण्यात आलेले हे सर्व कार्यक्रम सर्वासाठी खुले तसेच विनामूल्य आहेत. शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन त्याग,पराक्रमाचा इतिहास अनुभवावा असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आलेले आहे.

कार्यक्रमांचे वेळापत्रक - रविवार ३१ मे २०२६

१) सकाळी ८.३० वा.- 'गजनृत्य' सादरकर्ते -
श्री.अंबादास पडळकर व ३० सहकारी
स्थळ - मोरवाडी चौक, पिंपरी

२) सकाळी ९.०० वा- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना ढोलपथकाद्वारे अनोखे अभिवादन
सादरकर्ते - सामना ढोलपथक, मुंबई
स्थळ - मोरवाडी चौक, पिंपरी

३) सकाळी १०.३० वा. - पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन हस्ते - मा. महापौर स्थळ - पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत

४) सकाळी १०.४५ वा.- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास
पुष्पहार अर्पण करून अभिवादन हस्ते - मा. महापौर
स्थळ - मोरवाडी चौक, पिंपरी

५) सकाळी ११.०० वा. - पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन हस्ते - मा. महापौर स्थळ - सांगवी

६) दु. १२.३० वा.- 'सुवर्ण महाराष्ट्राचा लोकोत्सव' हा महाराष्ट्राची प्राचीन संस्कृतीचे दर्शन घडविणारा लोकोत्सव कार्यक्रम
(भूपाळी, वासुदेव. पिंगळा, वाघ्या मुरळी, धनगरीनृत्य, शाहिरी पोवाडे, आदिवासी, डोंबारी असे विविध व्यक्तीछटा)
स्थळ - मोरवाडी चौक, पिंपरी

७) दु. २.३० वा. - शाहिरी कार्यक्रम सादरकर्ते - शाहीर श्री. सुरेश जाधव व सहकारी, छत्रपती संभाजीनगर स्थळ - मोरवाडी चौक, पिंपरी

८) रात्री ९.०० वा. - पुण्यश्लोक हे अहिल्यादेवी होळकर यांच्या स्वाभिमानी व आदर्श वाटचालीचे दर्शन घडविणारे ७५ कलाकारांचे महानाट्य... सादरकर्ते - पुण्यश्लोक फाऊंडेशन, महाराष्ट्र स्थळ - नटसम्राट निळू फुले रंगमंदिर, सांगवी

या सर्व कार्यक्रमांस शहरवासियांनी उपस्थित रहावे असे आवाहन महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी यांनी केले आहे.

# फुगेवाडी विषारी दारू प्रकरण; वायसीएम रुग्णालयात दाखल रुग्णांच्या प्रकृतीची महापालिका आयुक्तांकडून विचारपूस

**पिंपरी । प्रतिनिधी**

फुगेवाडी येथील विषारी दारू सेवन केलेल्या रुग्णांना महापालिकेच्या पिंपरीतील यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या रुग्णांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी वायसीएम रुग्णालयाला भेट दिली. दाखल रुग्णांवर आवश्यक सर्व वैद्यकीय उपचार मोफत उपलब्ध करून दिले जात असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. रुग्णांच्या नातेवाईकांशी संवाद साधून त्यांना दिलासा देखील आयुक्तांनी दिला.

यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर यांच्यासह आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, वैद्यकीय अधीक्षक डॉ. उज्ज्वला अंदूरकर, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. शैलजा भावसार, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, वरिष्ठ पोलिस निरीक्षक गोरख कुंभार, तसेच वायसीएम रुग्णालयाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी रुग्णालयातील उपचार व्यवस्थेचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. रुग्णांवर केल्या जाणाऱ्या उपचारामध्ये कोणतीही कमतरता राहणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश त्यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. परिस्थिती लक्षात घेता रुग्णालय प्रशासनाने सतर्क राहून या प्रकरणातील आलेल्या रुग्णांना दाखल करून घेऊन त्यांच्यावर तात्काळ आवश्यक सर्व उपचार करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. दाखल रुग्णांच्या नातेवाईकांशी संवाद साधताना आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी या रुग्णांच्या प्रकृती विषयी माहिती दिली. महापालिकेच्या वतीने उत्तम वैद्यकीय उपचार रुग्णांवर केले जात आहेत. महापालिकेच्या वैद्यकीय पथकामार्फत सातत्याने या रुग्णांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवले जात असून या रुग्णांच्या



प्रकृतीत लवकरात लवकर सुधार येण्यासाठी वैद्यकीय यंत्रणा सातत्याने कार्यान्वित ठेवण्यात आल्याची माहिती आयुक्तांनी नातेवाईकांना दिली. काळजी करू नका, महापालिकेची वैद्यकीय यंत्रणा सर्वतोपरी प्रयत्न करत आहे असा धीर देखील रुग्णांच्या नातवाईकांना आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिला.

विषारी दारू प्रकरणातील दाखल सर्व रुग्णांवर तातडीने वैद्यकीय उपचार करण्यासाठी वायसीएम रुग्णालय प्रशासनाला आवश्यक त्या सर्व सुविधा मोफत उपलब्ध करून देण्याच्या तसेच परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

वायसीएम रुग्णालयात आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, तज्ञ डॉक्टर आणि पुरेसा औषधसाठा उपलब्ध आहे. या प्रकरणातील दाखल रुग्णांवर वैद्यकीय उपचार सुरू आहेत. सध्या तीन रुग्ण रुग्णालयात उपचार घेत असून त्यांच्या प्रकृतीवर रुग्णालय प्रशासन बारकाईने लक्ष ठेवून आहे. बाधित रुग्णांनी वेळेत वैद्यकीय उपचार करून घेणे अत्यंत आवश्यक असून या बाधितांनी तात्काळ रुग्णालयात दाखल होऊन उपचार घ्यावेत, असे आवाहन करण्यात येत आहे.

- डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# संपादकीय...

## उधळलेला दहशतवादी कट

दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय आणि अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमच्या नेटवर्कशी संबंधित संशयितांना अटक करून देशातील संभाव्य मोठा दहशतवादी हल्ला रोखल्याचा दावा केला आहे. या कारवाईमुळे देशातील सुरक्षा यंत्रणांच्या सतर्कतेचे कौतुक होत असले, तरी दुसरीकडे दहशतवादाचे बदलते स्वरूप आणि त्यामागील आंतरराष्ट्रीय जाळे याबाबत गंभीर प्रश्नही उपस्थित होत आहेत. गेल्या काही वर्षांत दहशतवादी संघटनांनी आपली कार्यपद्धती मोठ्या प्रमाणात बदलली आहे. पारंपरिक सीमा ओलांडून घुसखोरी करण्याऐवजी आता सोशल मीडिया, एन्क्रिप्टेड कम्युनिकेशन, आर्थिक व्यवहारांची गुप्त साधने आणि स्थानिक संपर्क यांचा वापर करून देशांतर्गत नेटवर्क उभारण्याचा प्रयत्न होत आहे. त्यामुळे दहशतवादाचा मुकाबला करणे अधिक गुंतागुंतीचे बनले आहे. दिल्ली, मुंबई, पंजाब, उत्तर प्रदेश यांसारख्या राज्यांमध्ये एकाच कालावधीत झालेल्या कारवाया पाहता, दहशतवादी कारवाया आता स्वतंत्र नसून परस्परांशी जोडलेल्या स्वरूपात कार्यरत असल्याचे चित्र समोर येत आहे. धार्मिक स्थळे, सरकारी कार्यालये, शैक्षणिक संस्था, रुग्णालये आणि सुरक्षा प्रतिष्ठाने यांना लक्ष्य करण्यामागे केवळ जीवितहानी घडवून आणणे हा उद्देश नसतो, तर समाजात भीती आणि अस्थिरतेचे वातावरण निर्माण करणे हाही त्यामागील हेतू असतो. याचबरोबर दहशतवाद आणि संघटित गुन्हेगारी यांच्यातील वाढता संबंधही चिंतेचा विषय आहे. अंडरवर्ल्ड नेटवर्क, हवाला व्यवहार, अंमली पदार्थांची तस्करी आणि दहशतवादी कारवाया यांच्यातील संबंध अनेक तपासांत समोर आले आहेत. त्यामुळे दहशतवादाविरोधातील लढाई ही केवळ सुरक्षा यंत्रणांची जबाबदारी न राहता आर्थिक गुन्हे, सायबर गुन्हे आणि गुप्तचर यंत्रणांच्या समन्वयाची लढाई बनली आहे. सुरक्षा यंत्रणांनी वेळेवर कारवाई करून संभाव्य धोका टाळला असेल, तर ते निश्चितच स्वागतार्ह आहे. मात्र अशा घटना वारंवार समोर येत असतील, तर केवळ आरोपींना अटक करून प्रश्न संपत नाही. त्यांच्या भरतीची प्रक्रिया, निधीचे स्रोत, स्थानिक मदतनीस आणि समाजातील असुरक्षित घटकांपर्यंत पोहोचण्याची त्यांची क्षमता यावरही प्रभावीपणे आळा घालणे आवश्यक आहे. देशाच्या सुरक्षेसाठी नागरिकांची जागरूकताही तितकीच महत्त्वाची आहे. संशयास्पद हालचालींची माहिती त्वरित प्रशासनाला देणे, अफवांपासून दूर राहणे आणि सामाजिक सलोखा जपणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. दहशतवादाचा मुकाबला केवळ शस्त्रांनी होत नाही; त्यासाठी मजबूत गुप्तचर व्यवस्था, प्रभावी प्रशासन, सामाजिक एकात्मता आणि नागरिकांचा सहभाग या सर्व घटकांची आवश्यकता असते. देशासमोरील हे आव्हान गंभीर असले तरी सुरक्षा यंत्रणांची सजगता, तांत्रिक क्षमता आणि जनतेचे सहकार्य यांच्या बळावर अशा कटांना यापुढेही यशस्वीपणे हाणून पाडता येईल, यात शंका नाही.

# स्वातंत्र्यवीर सावरकर महान देशभक्त

सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ साली नाशिक जिल्ह्यातील भागुर येथे झाला. सावरकरांच्या मनात जन्मापासूनच देशभक्तीची भावना ज्वालामुखी सारखी धकधकत होती आणि जसे-जसे सावरकर मोठे होत गेले तसतशी स्वातंत्र्यासाठी मशाल प्रज्वलित होत होती.विर सावरकरांनी लाला लजपतराय,बाळ गंगाधर टिळक व विपिन चंद्र पाल या महान क्रांतिकारक महापुरुषांपासुन प्रेरणा घेऊन आपली वाटचाल सुरू केली आणि क्रांतीचा लढा सुरू ठेवला व कोणत्याही गोष्टीची पर्वा न करता भारताला स्वतंत्र मिळावे यासाठी स्वतंत्र लढ्याच्या कुंडात उडी घेतली.१८५७ च्या गनिमी संघर्षाच्या विद्रोहाचा संपूर्ण अभ्यास केला. त्यावर आधारित एक पुस्तक लिहिले द हिस्ट्री ऑफ व वॉर ऑफ इंडियन इंडिपेंडन्स नावाच्या या पूस्तकाने इंग्रज प्रशासनाचे धाबे दणाणले. त्यामुळे हे पुस्तक इंग्रजांनी बेकायदेशीर ठरविले.परंतु सावरकरांच्या गनिमी काव्याने बिहारमध्ये हे पुस्तक लोकप्रिय झाले आणि स्वातंत्र्याची ज्वाला धकधकायला लागली.

सावरकर आणि त्याचा भाऊ गणेश यांनी भारतीय परिषद कायदा १९०९ च्या विरोधात निदर्शने केली. यावर इंग्रजांनी त्यांना गुन्हेगार ठरविले व अटक वॉरंट जारी केला अटक होवू नये म्हणून सावरकर पॅरिसला गेले.नंतर १९१० मध्ये सावरकरांना इंग्रजांनी पकडले व न्यायालयाने त्यांना दोषी ठरवुन ५० वर्षाची शिक्षा ठोठावली. ४ जुलै १९११ ला काळ्या पाण्याची शिक्षा जाहीर झाली व अंदमान आणि निकोबार येथील सेल्युलर जेलमध्ये टाकण्यात आले. तेथे त्यांच्यावर इंग्रजांकडुन सतत अत्याचार होत होते. परंतु त्यांनी स्वातंत्र्य लढ्याचा धीर सोडला नाही आणि अनेक यातना सहन करीत इंग्रजांना बजाऊन सांगितले की मी जिवंत आहे तोपर्यंत देश स्वतंत्र झालेला आपल्याला दिसेल व आपल्याला भारत सोडून जावे लागेल आणि हे सावरकरांनी सिद्ध करून दाखविले ही महानता सावरकरांमध्ये दिसून येते. सध्याच्या परिस्थितीत देशातील काही राजकीय पुढारी महापुरुषांबद्दल आक्षेपार्ह, विद्वेषक व चिथावणी देणारे विधान करतांना दिसतात. ही बाब अत्यंत घृणास्पद व निंदनीय आहे. देशाच्या इतिहासात सावरकरांना स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर असे संबोधले जाते.म्हणजेच स्वातंत्र्यवीर ही पदवी पारतंत्र्यातील देशभक्तांनीच दिली ही बाब आक्षेपार्हय



विधान करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. स्वातंत्र्यपुर्वकाळ अत्यंत खडतर आणि कठीण होता हे सर्वांनाच ठाऊक आहे. त्याकाळी स्वातंत्रवीर सावरकरांच संपूर्ण कुटुंब स्वतंत्र लढ्यात सहभागी होते.महाराष्ट्रात अनेक क्रांतिकारक, थोर पुरुष, साधु-संत, समाजसुधारक होवून गेले त्यामुळे महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून संबोधले जाते. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात प्रत्येक तळागाळातील व्यक्तींनी आपले वेगवेगळ्या पध्दतीने योगदान दिले आहे.तेव्हाच भारत स्वतंत्र झाला.इंग्रजांनी भारतावर १५० वर्षे राज्य केले.परंतु देशाला स्वातंत्र्य करण्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी आपल्या जिवाची पर्वा न करता हसत-हसत फासावर सुध्दा चढले ही बाब सर्वांनाच ग्यात आहे. सावरकरांचा काळ कसा होता किंवा त्यांनी स्वातंत्र्य लढा कसा उभारला ही बाब त्याकाळातील सहकाऱ्यांना व देशभक्तांनाच ग्यात असावी.परंतु आता सावरकरांच्या कर्तृत्ववावर कोणी राजकीय पुढारी चीखलफेक करीत असेल व आक्षेपार्ह विधान करीत असेल हे योग्य नाही असे मला वाटते.स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना झालेली काळ्यापाण्याची सजा आणि त्यांनी भोगलेल्या यातना यांचा इतिहास संपूर्ण शालेय पुस्तकांमध्ये लिखित आहे आणि हि शालेय पुस्तके आजची नसुन ७९ वर्षे जुनी आहे.

या संपूर्ण पुस्तकांमध्ये अनेक विचारवंतांनी, थोरपुरूशांनी सावरकरांच्या कामाची प्रशंसा सुध्दा केली आहे. तेव्हाच त्यांना स्वातंत्र्यवीर ही पदवी मिळाली व स्वातंत्रवीर सावरकर नावाने संबोधले जावु लागले. राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की स्वातंत्र्यवीर ही पदवी कोणालाही सहज मिळत नाही त्यासाठी त्याग करावा लागतो आणि सावरकरांनी स्वातंत्र्यासाठी आपल्या सर्वस्वाचा त्याग केला तेव्हाच त्यांना स्वातंत्र्यवीर ही पदवी मिळाली व भारत स्वतंत्र झाला ही बाब त्यांच्यावर टीका करणाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.त्याकाळी अनेक उतार चढाव होते यात दुमत नाही.परंतु परिस्थिती नुसार प्रत्येक व्यक्ती वेगवेगळ्या पध्दतीने निर्णय घ्यायचे. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या विचारसरणीचे लोक सुद्धा होते.यात जहालवादी, मवाळवादी, क्रांतिकारक अशा अनेक विचारधारांचे लोक होते. त्यामुळे आपसात मतभेद अवश्य असायचे परंतु मतभिन्नता नव्हती. त्यामुळे सर्वांचा एकच उद्देश होता तो म्हणजे भारताला इंग्रजांच्या तावडीतून मुक्त करून स्वतंत्र करने त्यापध्दतीने सर्वांनी आपआपले योगदान दिले व भारत १९४७ ला स्वातंत्र्य झाला.यात स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे मोठे योगदान होते.

सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ मध्ये झाला व त्याचा मृत्यू २६फेब्रुवारी १९६६ ला झाला.आज त्यांचा मृत्यू होऊन ६० वर्षे झालीत आणि भारत स्वतंत्र होऊन ७९ वर्षे झालीत मग आताच राजकीय पुढाऱ्यांना कसे काय आठवले की सावरकरांनी इंग्रजांना मदत केली. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा इतिहास महाराष्ट्रातील जनतेला, राजकीय पुढाऱ्यांना, पक्ष-विपक्षांना चांगल्या प्रकारे ग्यात आहे. त्यामुळे बाहेरच्या राजकीय पुढाऱ्यांनी महाराष्ट्रातील जनतेला स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल जास्त ग्यान देवु नये. कारण स्व.इंदिरा गांधीसह अनेकांनी सावरकरांचा उल्लेख स्वातंत्र्यवीर सावरकर असा अनेकदा केला आहे ही बाब सावरकरांचा विरोध करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.थोरमहात्मे, क्रांतिकारक,स्वातंतासेनानी किंवा आपले पुर्वज ज्यांच्या कर्तृत्ववामुळे आपण खुला स्वास घेत आहे अशांबद्दल अपशब्द किंवा आक्षेपार्ह विधान निघणार नाही याची काळजी सर्वच राजकीय पुढाऱ्यांनी घ्यावी.

सरकारला मी आग्रह करेल की स्वातंत्रवीर सावरकर यांच्या बद्दल किंवा आपल्या पुर्वजांबद्दल यानंतर कोणीही आक्षेपार्ह विधान केले तर त्यावर कठोर कारवाई करावी.सध्या देशात विद्वेषी वक्तव्य देण्याचे प्रकार वाढले आहेत.यामुळे सुप्रीम कोर्टाने दिनांक २८ एप्रिल २०२३ ला सुप्रीम कोर्टाने आदेश काढला की विद्वेषी वक्तव्ये करणारे यांची कोणी तक्रार करेल याची वाट न पाहता राज्यांनी कारवाई करावी.त्या कृतीस विलंब झाला तर तो कोर्टाचा अवमान समजला जाईल असे सुप्रीम कोर्टाने आपल्या आदेशात बजावले आहे.त्यामुळे विद्वेषी वक्तव्ये करणाऱ्यांनी आपल्या जिभेवर आवर घालावा. जोपर्यंत सुर्य -चंद्र-तारे-आकाश-पाताळ आहे तोपर्यंत सावरकरांचे व संपूर्ण देशभक्तांचे नाव देशात स्वाभिमानाने घेतले जाईल.आज जगातील युद्धजन्य परिस्थिती,बदलते हवामान व वाढते प्रदुषण यामुळे निसर्गाचे संतुलन डगमगायला लागले आहे.यावर मात आपण करू शकतो.याकरिता स्वतंत्रविर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त देशभरात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.यामुळे सर्वांनाच शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मदत होईल आणि गुरांना चारा मिळेल. आपण एकाच दिवशी वृक्ष लागवड केली तर लाखोंच्या संख्येने वृक्षलागवड होईल व प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात आपल्याला स्वतंत्रविर सावरकर यांचे दर्शन होईल. स्वातंत्रवीर सावरकरांना जयंती निमित्त माझा कोटी कोटी प्रणाम!जय हिंद.

**- रमेश कृष्णराव लांजेवार**

# देशातील पहिल्या 'एकीकृत शहर घनकचरा प्रक्रिया केंद्रा'मुळे कचरामुक्त शहराची संकल्पना साकार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर । प्रतिनिधी**

देशातील पहिला एकिकृत शहर घनकचरा प्रक्रिया प्रकल्प भांडेवाडी येथे खाजगी गुंतवणुकीतून साकारत असून या प्रकल्पामुळे कचरामुक्त शहराची संकल्पना प्रत्यक्षात येणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून सुमारे १ हजार २०० मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया होऊन २८ टन प्रतिदिन गॅसची निर्मिती होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिली.

भांडेवाडी परिसरात केवा सुस बडे या आंतरराष्ट्रीय उद्योग समूहातर्फे शहरात दररोज निर्माण होणाऱ्या १ हजार २०० मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया होणार आहे. या प्रकल्पाची पाहणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार सर्वश्री कृष्णा खोपडे, प्रवीण दटके महापौर नीता ठाकरे उपमहापौर लीना हातीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दानी, अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान, महानगरपालिका आयुक्त डॉ. विपीन इटणकर, केवा सुसबडे या प्रकल्पाच्या कार्यकारी संचालक रुंदा ठाकूर, फायनान्स डायरेक्टर विनोद तणदोन उपाध्यक्ष विजय



चिपळूणकर तसेच लोकप्रतिनिधी व अधिकारी उपस्थित होते.

एकिकृत शहर घनकचरा प्रक्रिया केंद्र तीन टप्प्यात पूर्ण होणार असून येत्या ऑगस्ट महिन्यापर्यंत शहरातील १ हजार २०० मेट्रिक टन कचऱ्यावर संपूर्ण प्रक्रिया अत्यंत आधुनिक पद्धतीने करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी ओला व सुका कचरा संकलित करून त्यावर प्रक्रिया होणार आहे. या प्रक्रियेनंतर बायोगॅस, कंपोस्ट खत तसेच सुक्या कचऱ्यापासून पावर प्लेट्स इंधन तयार होणार आहे.


भारतातील अशा प्रकारचा हा पहिलाच प्रकल्प आहे या प्रकल्पासाठी नागपूर महानगरपालिकेतर्फे ३० एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली असून गॅस विक्रीतून महानगरपालिकेला दरवर्षी १५ लाख रुपयांची रॉयल्टी सुद्धा मिळणार आहे. पर्यावरण पूरक या प्रकल्पासाठी प्रशासनातर्फे आवश्यक सहकार्य करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

एकिकृत शहर घनकचरा प्रक्रिया केंद्रामुळे पुढच्या काळात शहरातील सर्व कचऱ्यावर प्रक्रिया सुलभ होणार असून नागपूर शहर हे घनकचरा व्यवस्थापन तसेच कचरा मुक्त शहर म्हणून संपूर्ण भारतात ओळखले जाईल. या प्रकल्पामुळे पर्यावरणाची हानी होणार नसल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.

या प्रकल्पाच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या बायोगॅस वर शहरातील १९८ बसेस साठी सीएनजी ही ग्रीन एनर्जी उपलब्ध होणार आहे. खाजगी भागीदारी तत्त्वावर सुरू होणाऱ्या या प्रकल्पासाठी महानगरपालिकेला कुठलाही खर्च येणार नसून शहरात निर्माण होणाऱ्या १ हजार ३०० मेट्रिक टन कचरा व्यवस्थापनावर होणारा दैनंदिन खर्च वाचणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून चांगल्या प्रतीचे कंपोस्ट खत तयार होईल. महाजनकोसाठी लागणाऱ्या एनर्जी प्लेट्स सुद्धा उपलब्ध होणार आहेत.

कचऱ्यापासून खत व खतापासून बायोगॅस, कंपोस्ट खत, पावर प्लेट्स आदी निर्माण करणारा हा प्रकल्प अत्याधुनिक असल्यामुळे पर्यावरणासाठी आदर्श प्रकल्प म्हणून संपूर्ण भारतात ओळखल्या जाईल, असा विश्वासही यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. प्रारंभी केवा सुजबडे या प्रकल्पाच्या कार्यकारी संचालक रुंदा ठाकूर यांनी संपूर्ण प्रकल्पाची व घनकचऱ्यावर होणाऱ्या प्रक्रिये संदर्भात माहिती दिली. महापौर नीता ठाकरे व महापालिका आयुक्त डॉ. विपिन इटनकर यांनी या प्रकल्पासाठी महानगरपालिकेतर्फे आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली.

# महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषदेच्या अध्यक्षांना एक वर्षाची मुदतवाढ




**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील उच्च शिक्षण, शैक्षणिक संशोधन, नवोपक्रम आणि धोरणात्मक शैक्षणिक उपक्रमांना चालना देण्यासाठी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद (महासार्क) स्थापन करण्यात आली आहे. परिषदेच्या प्रभावी व सातत्यपूर्ण कामकाजाच्या दृष्टीने शासनाने परिषदेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असलेले डॉ. रवींद्र कुलकर्णी यांना एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे.

यापूर्वी शासनाने मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांची एका वर्षाच्या कालावधीसाठी अध्यक्षपदी नियुक्ती केली होती.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद (महासार्क) राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता वृद्धी, संशोधनाला प्रोत्साहन, नवोपक्रमांना चालना, शैक्षणिक संस्थांमधील समन्वय आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी २०२०) प्रभावीपणे राबविण्यासाठी महत्त्वाची भूमिका असणार आहे. परिषदेच्या माध्यमातून राज्यातील विद्यापीठे, महाविद्यालये आणि संशोधन संस्थांमध्ये शैक्षणिक उत्कृष्टता व संशोधन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

# 'सिंगल विंडो क्लिअरन्स' व्यवस्थेमुळे 'लाईव्ह इव्हेंट्स' संदर्भातील परवानगी प्रक्रिया गतिमान होणार - प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील लाईव्ह इव्हेंट, कॉन्सर्ट, सांस्कृतिक कार्यक्रम आणि महोत्सवांच्या आयोजनासाठी कमी कालावधीत आणि सुलभरित्या परवानग्या मिळण्यासाठी 'सिंगल विंडो क्लिअरन्स' प्रणाली माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत विकसित करण्यात येत आहे. या प्रणालीमुळे लाईव्ह इव्हेंट क्षेत्राच्या कार्यप्रणाली प्रक्रिया निश्चित गतिमान होणार आहे, असा विश्वास माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी व्यक्त केला.

मंत्रालयातील परिषद सभागृहात लाईव्ह इव्हेंट्स क्षेत्रातील विविध संस्था प्रतिनिधींसमवेत आयोजित बैठकीत प्रधान सचिव तथा महासंचालक सिंह बोलत होते.

या बैठकीस सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव समृद्धी अनगोळकर, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक (प्रशासन) किशोर गांगुर्डे, संचालक (माहिती) गोविंद अहंकारी तसेच लाईव्ह इव्हेंट आयोजित करणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी ईव्हीए लाईव्हचे संचालक विनोद जनार्धन, लक्ष मीडिया ग्रुपचे सिईओ शाजू इग्नाथस, मिडास नेक्स्ट मीडियाचे संस्थापक व महाव्यवस्थापक दीपक पवार, ईईएमएचे सचिव अंकुर कालरा, बीएमएस लाइव्हचे उपमहाव्यवस्थापक स्वप्नील माने, थिएटर प्रोड्यूसर अश्विन गिडवाणी, यूनडीपी इंडियाच्या संचालिका कविता सचवानी, बुकमायशोचे अनिल माखिजा, साहिल कुलंगरा, हर्षल कोठारी आदी उपस्थित होते.

प्रधान सचिव ब्रिजेश सिंह म्हणाले की, राज्यातील लाईव्ह इव्हेंट क्षेत्राची आर्थिक, सांस्कृतिक आणि पर्यटनविषयक प्रचंड क्षमता आहे. या क्षेत्राच्या विकासासाठी शासन सकारात्मक भूमिका घेत आहे. सध्या कार्यक्रम आयोजनासाठी विविध विभागांकडून स्वतंत्र परवानग्या घ्याव्या लागत असल्याने आयोजकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. शिवाय यामध्ये बराच कालवधी लागतो. या प्रक्रियेत सुसूत्रता आणण्यासाठी आणि कालबद्ध पद्धतीने परवानग्या उपलब्ध



करून देण्यासाठी सिंगल विंडो प्रणाली विकसित करण्यात येत आहे. महाराष्ट्रासाठी लाईव्ह इव्हेंट्सच्या परवानगी घेण्यासाठी प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) तयार करण्यात येणार असून, याधारे लाईव्ह इव्हेंट्चे कार्यक्रम आयोजन करणाऱ्यांना सर्व आवश्यक परवानग्या एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे.

लाईव्ह इव्हेंट उद्योगासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्यासाठी शैक्षणिक संस्था, उद्योग क्षेत्र आणि शासन यांच्यात समन्वय करण्यात येणार आहे. कौशल्य विकास, विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आणि युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करण्यासाठी संयुक्त प्रयत्न करण्यात येणार आहेत. उद्योग क्षेत्राकडून प्राप्त झालेल्या सूचना आणि शिफारशींचा विचार करून महाराष्ट्रासाठी प्रभावी, पारदर्शक आणि उद्योगपूरक कार्यपद्धती विकसित करताना प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्यावर भर असेल. लाईव्ह इव्हेंट क्षेत्राला चालना मिळण्याबरोबरच पर्यटन, गुंतवणूक, रोजगार निर्मिती आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेलाही बळकटी मिळेल, असा विश्वास प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी व्यक्त केला.

प्रधान सचिव ब्रिजेश सिंह म्हणाले की, लाईव्ह इव्हेंट क्षेत्राशी संबंधित विविध अडचणी दूर करून या उद्योगाला अधिक सक्षम, सुलभ आणि स्पर्धात्मक वातावरण उपलब्ध करून देणे हा शासनाचा प्रमुख उद्देश आहे. यासाठी परवानगी प्रक्रियेत सुसूत्रता आणून ती अधिक पारदर्शक, कालबद्ध आणि उद्योगपूरक करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे राज्यातील मनोरंजन उद्योगाला चालना मिळण्याबरोबरच पर्यटन, गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीच्या संधींमध्येही वाढ होईल. तसेच महाराष्ट्राला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील मोठ्या कार्यक्रमांसाठी आकर्षक केंद्र म्हणून विकसित करण्यास मदत होईल, असेही ब्रिजेश सिंह यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीत उद्योग प्रतिनिधींनी परवानगी प्रक्रियेतील अडचणी, विविध विभागांमधील समन्वय, गर्दी व्यवस्थापन, वाहतूक नियोजन, सुरक्षा मानके, पर्यावरणपूरक कार्यक्रमांचे आयोजन, कौशल्य विकास आणि तंत्रज्ञानाचा वापर यांसंदर्भात विविध सूचना मांडल्या. बैठकीत महाराष्ट्रातील सांस्कृतिक, संगीत, खाद्य आणि पर्यटन महोत्सवांना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रोत्साहन देण्यासाठी प्रभावी ब्रँडिंग, प्रायोजकत्व, महसूल निर्मिती आणि खासगी क्षेत्राच्या सहभागाबाबतही चर्चा झाली. पर्यावरणपूरक 'ग्रीन इव्हेंट्स', कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक वाहतुकीचा वापर आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी उद्योग क्षेत्राने केलेल्या उपक्रमांची माहितीही यावेळी देण्यात आली.

## थोडक्यात

### स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी समन्वयातून प्रभावी यंत्रणा उभारा - सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर

**मुंबई । प्रतिनिधी**

पीसीपीएनडीटी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनाचे कठोर धोरण आहे. या कायद्याच्या व्यापक प्रसार, प्रचार व अंमलबजावणीत राज्य तपासणी व संनियंत्रण समितीच्या सदस्यांनी आवश्यक सहकार्य व मार्गदर्शन करून समन्वयातून प्रभावी यंत्रणा उभारली जावी, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.

आरोग्य भवन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली राज्य तपासणी व संनियंत्रण समितीची बैठक झाली. बैठकीस आमदार स्नेहा दुबे, प्रधान सचिव निपुण विनायक, अतिरिक्त संचालक डॉ. संदीप सांगळे, उपसंचालक (विलटो) डॉ. दिगंबर कानगुले, सहाय्यक संचालक डॉ. वैशाली बडधे व समितीचे सदस्य उपस्थित होते. मंत्री आबिटकर म्हणाले, पीसीपीएनडीटी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यातील सर्व संबधित यंत्रणांमध्ये योग्य समन्वय निर्माण करून त्याचा उपयोग मूळ उद्देश साध्य करण्यासाठी करावा, यासाठी स्वतंत्र 'डेडिकेटेड टीम' आणि 'डेडिकेटेड यंत्रणा' नियुक्त करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. यासाठी ठरविलेली कार्यपद्धती प्रभावीपणे राबविणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

मंत्री अबिटकर म्हणाले, समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा विषय असल्याने लोकप्रतिनिधींनी आपल्या कार्यक्षेत्रात वेळ देऊन या मोहिमेत सहभागी झाल्यास या कामाला वेग येईल. यासाठी सर्वांनी जबाबदारीने योगदान द्यावे. समिती सदस्यांनी सुचवलेल्या सूचनांचा विचार केला जाईल, असेही मंत्री आबिटकर यांनी सांगितले.

### ग्रामविकास भवनातून ग्रामीण प्रशासनाला मिळणार नवी दिशा - ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे

**मुंबई । प्रतिनिधी**

खारघर, नवी मुंबई येथे उभारण्यात आलेल्या ग्रामविकास भवन या शासकीय इमारतीची आज ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी पाहणी केली. ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी, प्रशासकीय समन्वय तसेच प्रशिक्षण उपक्रमांसाठी हे संकुल महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून विकसित करण्यात आले आहे.

यावेळी ग्रामविकास भवनातील विविध प्रशासकीय विभाग, प्रशिक्षण कक्ष, बैठकींसाठी उपलब्ध सुविधा तसेच इतर पायाभूत सुविधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. ग्रामीण भागातील विकासकामांना अधिक गती देण्यासाठी सक्षम व आधुनिक प्रशासकीय यंत्रणा उभारणे आवश्यक असून, त्यादृष्टीने ग्रामविकास भवनाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. ग्रामीण विकास विभागाच्या कामकाजात अधिक सुसूत्रता, समन्वय आणि कार्यक्षमता निर्माण व्हावी, यासाठी आधुनिक तंत्रज्ञान व सुविधा उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. राज्यातील ग्रामविकासाशी संबंधित विविध उपक्रम, प्रशिक्षण प्रक्रिया आणि प्रशासकीय नियोजन अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी ग्रामविकास भवन हे केंद्र उपयुक्त ठरेल, असा विश्वास यावेळी ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केला.

### १७३ गाव वॉटर ग्रीड योजनेचा पुनरारंभ; दोन दिवसांत गावागावात शुद्ध पाणी

**जालना । प्रतिनिधी**

परतूर व मंठा तालुक्यातील १७३ पाणीटंचाईग्रस्त गावांसाठी दिलासादायक ठरलेल्या वॉटर ग्रीड योजनेचा नागापूर येथील जलशुद्धीकरण केंद्रातून आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते जल्लोषात पुनरारंभ करण्यात आला. या योजनेमुळे पुढील दोन दिवसांत सर्व १७३ गावांना शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत होणार आहे. वीजबिल व पाणीपट्टीची एक कोटींपेक्षा अधिक थकबाकी झाल्याने योजना बंद पडली होती. आमदार लोणीकर यांच्या पाठपुराव्यामुळे ग्रामपंचायतींकडून ३९ लाख रुपयांहून अधिक निधी जमा करण्यात आला आणि योजना पुन्हा सुरू करण्यात यश आले.

नागापूर येथील अत्याधुनिक केंद्रातून दररोज ३ कोटी २० लाख लिटर पाणी शुद्ध करण्याची क्षमता असून विविध जलकुंभांमार्फत गावांपर्यंत पाणी पोहोचवले जात आहे.

# मतिमंद मुलगा बरा करतो म्हणत भोंदू बाबाची लाखोंची फसवणूक; महिलेवर अत्याचाराचाही आरोप

**अहमदनगर । प्रतिनिधी**

तिमंद मुलाचा आजार पूर्णपणे बरा करण्याचं आणि भावाचं लग्न जमवून देण्याचं खोटं आमिष दाखवून एका भोंदू बाबाने हतबल कुटुंबाची तब्बल साडेसहा लाख रुपयांची मोठी आर्थिक फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार पारनेरमध्ये उघडकीस आला. ही केवळ आर्थिक फसवणूक नसून, या नराधम भोंदू बाबाने मुलाला जिवंत मारण्याची धमकी देऊन पीडित महिलेवर वारंवार जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केल्याचीही अत्यंत घृणास्पद घटना समोर आली आहे. याप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात मुख्य भोंदू बाबा, त्याचा मुलगा आणि एका महिला साथीदाराविरुद्ध विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पारनेर तालुक्यातील ग्रामीण भागात राहणाऱ्या ४० वर्षीय पीडित शेतकरी महिलेचा १७ वर्षांचा मुलगा हा मतिमंद आहे. अनेक ठिकाणी वैद्यकीय उपचार करूनही त्याच्या प्रकृतीत कोणतीही सुधारणा होत नव्हती. त्यातच शेतीत चांगले पिके येऊनही घरातील कर्ज फिटत नव्हते आणि गरिबी हटत नव्हती.

याच दरम्यान पीडितेचा सख्खा भाऊ याचेही वय झाले तरी त्याचे लग्न जमत नव्हते. अशा अनेक कौटुंबिक अडचणींनी खचलेल्या या महिलेला पारनेर तालुक्यातील रुई छत्रपती येथील राजू दिवटे, त्याचा मुलगा शशिकांत दिवटे आणि त्यांची महिला सहकारी शोभा तरटे हे देवऋषी (देवभगत) असून ते कोणत्याही संकटावर हमखास तोडगा काढतात, अशी अंधश्रद्धेतून खोटी माहिती मिळाली होती.

पीडितेने वर्ष २०२० मधील कोरोना काळापासून या भोंदूबाबाकडे आपल्या समस्या घेऊन जाण्यास सुरुवात केली होती. त्यावेळी पीडितेची हतबलता



ओळखून संशयित भोंदूबाने, 'तुमच्या संपूर्ण कुटुंबाला मांढरदेवीच्या काळुबाईची मोठी बाधा आहे, ती घालवण्यासाठी घरात होमहवन आणि मोठी पूजा करावी लागेल,' असं सांगून भीती घातली.

मुलाच्या तांत्रिक उपचारासाठी ३ ते ४ लाख रुपये आणि भावाच्या लग्नाचा तोडगा काढण्यासाठी दीड लाख रुपये खर्च येईल, असं सांगून त्यांनी पीडितेकडून मुलाचे आणि भावाचे फोटो जादुटोणा व तंत्र-मंत्र करण्यासाठी मागवून घेतले.

सुरुवातीला पूजेच्या साहित्याच्या नावाखाली महिला सहकारी शोभा तरटे हिने १० हजार रुपये रोख घेतले. अशा प्रकारे वेळोवेळी भोंदू बाबाने कुटुंबाकडून ६ लाख ५० हजार रुपये उकळले. एवढे पैसे देऊन आणि होमहवन करूनही मुलाच्या प्रकृतीत काहीच फरक पडत नसल्याने आणि उलट छळ वाढत असल्याने महिलेला आपली मोठी आर्थिक व शारीरिक फसवणूक झाल्याचे समजलं.

त्यानंतर तिने धीर धरून थेट पारनेर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करताच तातडीने चक्र फिरवून रात्री उशिरा मुख्य भोंदू बाबा राजू दिवटे याला अटक केली. पोलीस या प्रकरणाचा पुढील सखोल तपास करत आहेत.

## चंद्रपुरात मातेचे काळीज काळवंडले! स्वतःच्या दोन मुलांची विक्री; नातीचाही सौदा करण्याचा प्रयत्न

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर शहरातून एक अतिशय धक्कादायक प्रकार उजेडात आला आहे. यात स्वतःच्या पोटच्या दोन मुलांची एका महिलेने विक्री केल्याचा प्रकार उघडकीस आलाय. संतापजनक बाब म्हणजे स्वतःच्या १५ वर्षीय अल्पवयीन मुलीच्या नवजात बाळाला विकण्याच्या तयारीत ही महिला होती. मात्र या प्रकरणाची माहिती पोलिसांना मिळताच रामनगर पोलिसांनी तात्काळ धाव घेत या आरोपी महिलेला अटक केली आहे. मात्र या घटनेनं शहरात एकच खळबळ उडाली असून सध्या पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, मुख्य आरोपी असलेल्या ४० वर्षीय महिलेच्या पतीचा ४ वर्ष आधी मृत्यू झाला होता. मृत्यूनंतर ही महिला २६ वर्षीय अजय फुलझेले या तरुणासोबत 'लिव्ह इन' मध्ये राहत होती. दरम्यान, अजय फुलझेले पासून झालेल्या दोन बाळांची या महिलेने जून २०२४ आणि ऑक्टोबर २०२५ मध्ये तेलंगानाच्या कागजनगर आणि चंद्रपूर शहरातील एका महिलेला अंदाजे चार ते पाच लाख रुपयांमध्ये विक्री केली होती. याच दरम्यान आरोपी प्रियकर अजय फुलझेले याने मुख्य आरोपी असलेल्या महिलेच्या १५ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केला. या अत्याचारातून गर्भवती झालेल्या अल्पवयीन मुलीची नागपूर मेडिकल कॉलेजमध्ये प्रसूती करण्यात आली. मात्र या सर्व प्रकरणाचा रामनगर पोलिसांना सुगावा लागल्याने त्यांनी पीडित अल्पवयीन मुलीचा जबाब नोंदवला असता सत्य समोर आलं.

दरम्यन, पीडितेच्या जबाबावरून रामनगर पोलिसांनी मुख्य आरोपी असलेली ४० वर्षीय महिला आणि बाळ विकत घेणाऱ्या कागजनगर आणि चंद्रपूर शहरातील दोन महिलांना अटक केलीय. या प्रकरणातील आरोपी प्रियकर अजय फुलझेले सध्या फरार असून पोलीस त्याचा त्याचा शोध घेत आहे. या प्रकरणामागे नवजात बाळांची विक्री करणारं रॅकेट सक्रिय आहे का? याचा देखील पोलीस शोध घेतायेत. मात्र या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली असून सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे.

## अंगणवाडी आहार दरवाढ, कर्मचारी निवृत्ती वयवाढीसह विविध मागण्यांवर शासन सकारात्मक - मंत्री आदिती तटकरे

**मुंबई । प्रतिनिधी**



अंगणवाडी बालकांना अधिक गुणवत्तापूर्ण आहार उपलब्ध करून देण्यासाठी आहार दरवाढीबाबत शासन सकारात्मक असून त्यासंदर्भातील कार्यवाही सुरू आहे. तसेच अंगणवाडी मदतनीस पदावरून थेट नियुक्तीने अंगणवाडी सेविका पदावर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वरून ६५ वर्षे करण्यासंदर्भातही सकारात्मक पावले उचलली जात आहेत, अशी माहिती महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत मंत्रालयात आयोजित बैठकीत मंत्री तटकरे बोलत होत्या. बैठकीत अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या प्रतिनिधींशी सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी सचिव डॉ. अनुपकुमार यादव, आयुक्त माधवी सरदेशमुख, सहसचिव वि.रा. ठाकूर, एकात्मिक बालविकास सेवा योजनेचे विजय क्षीरसागर, भारतीय कामगार संघटनेचे अध्यक्ष डॉ. डी.एल. कराड, अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या अध्यक्ष शुभा शमीम आदी उपस्थित होते.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, अंगणवाडीतील बालकांना अधिक उत्कृष्ट आणि पोषक आहार मिळावा यासाठी आहार दरवाढीचा प्रस्ताव प्रक्रियेत आहे. कर्मचाऱ्यांच्या उपदान (ग्रॅज्युएटी) संदर्भात शासन सकारात्मक असून विभागामार्फत त्यासंबंधी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तसेच प्रोत्साहन भत्ता आणि केंद्र शासनाकडील थकीत मानधन तातडीने अदा करण्याबाबतही कार्यवाही सुरू आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील अंगणवाडी केंद्रांच्या भाडेवाढीसंदर्भात केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असून त्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या कामकाजातील अडचणी कमी करण्यासाठी केंद्रांमध्ये वाय-फाय सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही कार्यवाही करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी अंगणवाडी कर्मचारी व सेविकांच्या इतर विविध मागण्यांवरही चर्चा करण्यात आली.

## संतोष देशमुख प्रकरणाला नवे वळण; साक्ष बदलण्यासाठी सख्या भावाकडूनच जीवे मारण्याची धमकी

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्यातील संतोष देशमुख प्रकरणात आता एक अत्यंत धक्कादायक आणि खळबळजनक वळण समोर आले आहे. या प्रकरणातील साक्षीदार दादा खिंडकर याला या केसमध्ये साक्ष न देण्यासाठी आणि हे प्रकरण मिटवून घेण्यासाठी त्याच्या सख्ख्या लहान भावानेच जीवे मारण्याची धमकी दिली आहे. याप्रकरणी बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, मृत सरपंच संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांचा साडू दादा खिंडकर हा संतोष देशमुख प्रकरणात कायदेशीर प्रक्रियेत सक्रिय आहे. दादा खिंडकर हा आपल्या घरी असताना, त्याचा लहान भाऊ समाधान खिंडकर हा त्या ठिकाणी आला. त्याने जुन्या वादाची कुरापत काढत दादा खिंडकरला थेट बजावले की, तू धनंजय देशमुख यांच्यासोबत राहू नकोस आणि संतोष देशमुख प्रकरणात साक्ष देऊ नकोस. ते प्रकरण मिटवून घ्यायला सांग.

लहान भावाच्या या धमकीवजा इशाऱ्यावर दादा खिंडकरने, तुला याच्याशी काय करायचे आहे? तू तुझे काम कर, असे उत्तर दिले. या उत्तराचा राग मनात धरून लहान भाऊ समाधान खिंडकर याने दादा खिंडकरला शिवीगाळ केली. या प्रकारानंतर दादा खिंडकरने थेट पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी तातडीने दखल घेत अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली आहे.

तक्रारदार दादा खिंडकर आणि आरोपी समाधान खिंडकर या दोन्ही भावांमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून कौटुंबिक आणि इतर कारणांवरून वाद सुरू आहेत. दरम्यान, यापूर्वी काही तरुणांना मारहाण केल्याप्रकरणी दादा खिंडकर याच्यावरही गुन्हा दाखल झाला होता. मात्र, थेट हत्या प्रकरणातील साक्ष बदलण्यासाठी सख्या भावानेच धमकी दिल्याने या प्रकरणाला आता वेगळेच वळण लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

आता या प्रकरणात आणखी काय माहिती समोर येणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## ट्रॅव्हल्स आणि दुचाकीची समोरासमोर धडक; चार जण ठार, मानवत शहर शोकसागरात

**परभणी । प्रतिनिधी**

परभणी-पाथरी महामार्गावरील राहुल जिनिंगसमोर अत्यंत भीषण अपघाताची घटना घडलीय. परभणीहून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या एका ट्रॅव्हल्सने समोरून येणाऱ्या दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील चारही तरुणांचा जागीच मृत्यू झालाय. या दुर्घटनेमुळे मानवत शहरावर शोककळा पसरली आहे.

परभणीहून पुण्याकडे जाणारी ट्रॅव्हल्स (क्रमांक NL 01 B 1374)आणि मानवतच्या राहुल जिनिंगसमोर समोरून येणाऱ्या दुचाकीला (क्रमांक MH 22 BB 4724) ट्रॅव्हल्सने समोरासमोर जोर दार धडक दिली. हि धडक इतकी भीषण होती की दुचाकीचा अक्षरशः चक्काचूर झालाय. अपघाताचा



मोठा आवाज ऐकून परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. या भीषण अपघातात दुचाकीवरील चारही तरुण जागीच ठार झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, मृतांची नावे शुभम आप्पाराव दहे (वय ३०), विष्णू गोरे (वय २८), प्रल्हाद अशोकराव कुटे (वय २९) आणि नवनाथ शामराव जाधव (वय ३८, सर्व रा. मानवत) अशी आहेत. अपघाताची तीव्रता इतकी मोठी होती की, मृतदेहांची अवस्था अत्यंत विदारक झाली होती. त्यामध्ये एका मृताची ओळख पटविणे सुरुवातीला पोलिसांसाठी आणि नागरिकांसाठीही कठीण झाले होते. घटनेची माहिती मिळताच मानवत पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप बोरकर, पोलीस उपनिरीक्षक किशन पतंगे, प्रमोद देवकते, शीतल बोर्डे तसेच अन्य पोलीस कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने मृतदेह रुग्णालयात हलवले तसेच अपघातग्रस्त वाहने बाजूला करत महामार्गावरील वाहतूक सुरळीत केली.

या अपघातामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. दरम्यान, या प्रकरणी मानवत पोलीस पुढील तपास करत आहेत. एकाच वेळी मानवत येथील चार तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने संपूर्ण शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

# धारदार शस्त्रे आणि गोळीबारात ६ जणांची हत्या

## २५ एकर जमिनीचा वाद ठरला जीवघेणा; गोविंदपूरमध्ये सहा जणांची हत्या

**विजापूर । प्रतिनिधी**

मालमत्तेच्या वादातून कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील चडचण तालुक्यात असलेल्या गोविंदपूर गावात शुक्रवारी भीषण हत्याकांड घडले. धारदार शस्त्रांनी हल्ला करून त्यानंतर गोळ्या झाडत सहा जणांची निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील भीमा नदी परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, या भागातील जुन्या वैमनस्याच्या घटना पुन्हा चर्चेत आल्या आहेत.

पोलिस आणि स्थानिक सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, निराळे आणि गोळगी कुटुंबांमध्ये सुरू असलेल्या दीर्घकालीन जमीन वादातून हा रक्तरंजित संघर्ष उफाळून आला. हल्लेखोरांनी प्रथम धारदार शस्त्रांनी हल्ला केला आणि त्यानंतर गोळीबार करत सहा जणांचा जीव घेतल्याचा आरोप आहे. या घटनेत रेवणसिद्धप्पा निराळे, दुंडप्पा रेवणसिद्धप्पा निराळे, शिवपुत्र रेवणसिद्धप्पा निराळे, चंद्रशेखर निराळे आणि शब्बीर नदाफ यांचा मृत्यू झाला. तसेच आणखी एका व्यक्तीचाही मृत्यू झाल्याने मृतांचा आकडा सहावर पोहोचल्याची माहिती पोलिसांनी दिली.

शेतजमिनीच्या मालकी हक्कावरून दोन्ही कुटुंबांमध्ये अनेक वर्षांपासून तणाव होता. हा वाद मिटवण्यासाठी काही दिवसांपूर्वी स्थानिक स्तरावर मध्यस्थीची बैठकही घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

शुक्रवारी जमीन वादावर तोडगा काढण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या आणखी एका बैठकीसाठी निराळे कुटुंबातील सदस्य आणि इतर काही जण गेले असता त्यांच्यावर हल्लेखोरांच्या टोळीने अचानक हल्ला चढवला. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले असून कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून गावात कडेकोट पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या प्रकरणी चडचण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. घटनेबाबत अधिक तपशील अद्याप समोर आलेला



नाही.

महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील भीमा नदीच्या तीरावरील गावांमध्ये जमीन वाद, अनैतिक संबंध तसेच स्थानिक वैमनस्याच्या कारणांवरून यापूर्वीही अनेक खून आणि हिंसक घटना घडल्या आहेत. गेल्या काही वर्षांत अशा घटनांमध्ये काहीशी घट झाल्याचे बोलले जात असतानाच या सामूहिक हत्याकांडामुळे भीमेचा परिसर पुन्हा एकदा रक्तरंजीत झाला आहे.

गोविंदपूर येथील निराळे कुटुंब हे चडचण परिसरातील प्रतिष्ठित आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबांपैकी एक मानले जाते. या मोठ्या संयुक्त कुटुंबात ३० हून अधिक सदस्य वास्तव्यास आहेत. हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले चंद्रशेखर निराळे हे माजी तालुका पंचायत सदस्य होते.

प्राथमिक माहितीनुसार, सुमारे २५ एकर जमिनीच्या व्यवहारातून हा वाद अधिक तीव्र झाला होता. निराळे कुटुंबाने ही जमीन प्रतिएकर १५ लाख रुपयांप्रमाणे खरेदी केली होती. मात्र, बाजारभाव जास्त असताना कमी दरात जमीन विकली गेल्याने गोळगी कुटुंब नाराज होते. संबंधित जमीन स्वतः खरेदी करण्याची इच्छा असलेल्या अप्पुगौडा गोळगी यांनी निराळे कुटुंबाला हा व्यवहार करू नये, अशी धमकी दिल्याची माहितीही समोर आली आहे.

तरीही जमीन व्यवहार पूर्ण झाल्यानंतर संतप्त झालेल्या गोळगी कुटुंबीयांनी सूडाच्या भावनेतून हल्ला केल्याचा आरोप केला जात आहे. ऊस तोडणीसाठी वापरल्या जाणाऱ्या धारदार शस्त्रांचा या हल्ल्यात वापर झाल्याचे सांगितले जात आहे. निराळे आणि गोळगी कुटुंबांमध्ये गेल्या १५ वर्षांपासून जमिनीच्या मालकीवरून वाद सुरू होता. संबंधित जमीन निराळे कुटुंबाने खरेदी केल्यानंतर हा संघर्ष अधिकच चिघळला आणि अखेर त्याचे रूप रक्तरंजित हत्याकांडात झाले.

# जालन्यात अवैध गोवंश कत्तलीचा भंडाफोड; चंदनझीरा पोलिसांच्या कारवाईने शहरात खळबळ..!..

## बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा करारा दणका; नॅशनल नगरमधील कत्तलखाना उद्ध्वस्त..!..

**जालना । प्रतिनिधी**

आज दिनांक २८ गुरुवार रोजी दुपारी तीन वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना शहरातील नॅशनल नगर मध्ये तेघबीर सिंह संधू यांच्या मार्गदर्शनाखाली जालना शहर पोलिसांनी बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर मोठी आणि धडाकेबाज कारवाई करत नॅशनल नगर परिसरातील अवैध कत्तलखान्यावर छापा टाकला. या कारवाईत तब्बल ११ गोवंशांची कत्तल करण्यात आल्याचे उघड झाले असून, पोलिसांनी सुमारे ७ लाख रुपयांचे गोवंश मांस जप्त केले आहे. तसेच घटनास्थळावरून १३ जिवंत गोवंशांची सुटका करण्यात आली असून त्यांची अंदाजे किंमत ४.५० लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. या कारवाईमुळे संपूर्ण जालना शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जालना शहरातील नॅशनल नगर परिसरात अवैधरित्या जनावरांची कत्तल सुरू असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती.





बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शहरात विशेष सतर्कता ठेवण्यात आली असताना आज सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या दरम्यान एका गुप्त खबऱ्यामार्फत माहिती देण्यात आली की, सकाळी १० वाजल्यापासून संबंधित ठिकाणी सर्रास गोवंशांची कत्तल सुरू आहे.

या माहितीच्या आधारे बाळासाहेब पवार यांनी आपल्या पथकासह तात्काळ घटनास्थळी धाड टाकली. पोलिसांनी छापा मारताच घटनास्थळी धक्कादायक वास्तव समोर आले. तब्बल ११ गोवंशांची कत्तल करण्यात आल्याचे निदर्शनास आले, तर इतर अनेक जनावरे देखील बांधून ठेवण्यात आली होती. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत १३ जिवंत गोवंशांची सुटका केली.

या प्रकरणात शेख मुस्ताक नूर मोहम्मद, रा. नॅशनल नगर, जालना हा व्यक्ती अनधिकृतपणे कत्तलखाना चालवत असल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून सुमारे ७ लाख रुपयांचे गोवंश मांस आणि ४.५० लाख रुपये किंमतीची जिवंत जनावरे असा एकूण साडेअकरा लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

विशेष म्हणजे, शासनाने गोवंश कत्तलीवर स्पष्ट बंदी घातलेली असताना आणि बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने विशेष दक्षता घेतलेली असताना ही अवैध कत्तल सुरू असल्याचे उघड झाल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे. पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे अवैध कत्तलखाने चालवणाऱ्यांमध्ये मोठी भीती निर्माण झाली आहे.

दरम्यान, पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांच्या कठोर भूमिकेमुळे आणि चंदनझीरा पोलिसांच्या तत्पर कारवाईमुळे सर्व स्तरातून पोलिसांचे कौतुक होत आहे. शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांनी अशीच कठोर कारवाई पुढेही सुरू ठेवणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

# नाल्याच्या घाणीने त्रस्त नागरिकांचा रास्ता रोको

## संग्राम नगर परिसरात आंदोलन; सांडपाणी रस्त्यावर, दुर्गंधीमुळे नागरिक हैराण

**जालना । प्रतिनिधी**

शहरातील संग्राम नगर परिसरातील नागरिकांनी आज बस स्टँड ते पोलीस काम्प्लेक्स रोडवर रास्ता रोको आंदोलन करत महानगरपालिकेच्या विरोधात तीव्र संताप व्यक्त केला. यावेळी परिसरातील महिलांची मोठ्या संख्येने ऊपस्थिती होती. परिसरातील मुख्य नाल्याची साफसफाई होत नसल्याने नाल्याचे घाण पाणी थेट रस्त्यावर वाहत असून नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.



गेल्या अनेक दिवसांपासून नाल्यात मोठ्या प्रमाणात कचरा साचलेला असून दुर्गंधीमुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. नाल्याचे पाणी रस्त्यावर येत असल्याने वाहनचालक व पादचाऱ्यांनाही मोठी कसरत करावी लागत आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि व्यापाऱ्यांना याचा फटका बसत असल्याचे नागरिकांनी सांगितले.

आंदोलनादरम्यान नागरिकांनी प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत तात्काळ नाल्याची साफसफाई करावी, अतिक्रमण हटवावे आणि सांडपाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवावा अशी मागणी केली. अनेक वेळा तक्रारी करूनही महानगरपालिकेकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. आंदोलनाची माहिती मिळताच महानगरपालिकेचे काही अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. यावेळी अधिकाऱ्यांनी आंदोलन करताना परिसर स्वच्छ करण्याचे तसेच अतिक्रमण काढण्याचे आश्वासन दिले परंतु आंदोलनकर्ते आपल्या भूमिकेवर ठाम होते. यावेळी आंदोलनकर्त्यांनी महानगरपालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना चांगलेच झापले.

परिसरातील नागरिकांनी इशारा दिला की, लवकरात लवकर उपाययोजना न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल. आंदोलनादरम्यान काही काळ वाहतूक खोळंबली होती.

# महसुल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांची विविध प्रकल्पास भेट व कार्यालयांची पाहणी

**जालना । प्रतिनिधी**

राज्याचे अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे हे आज (दि. २९ मे) जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता, त्यांनी आज विविध विकास प्रकल्प आणि शासकीय कार्यालयास प्रत्यक्ष भेट देवून कामांची पाहणी केली.



अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे यांच्या दौऱ्याची सुरुवात दरेगाव (ता. जालना) येथील ड्रायपोर्ट प्रकल्पाच्या पाहणीने झाली. या प्रकल्पाची सद्यस्थिती, उपलब्ध सुविधा तसेच भविष्यातील नियोजनाबाबत त्यांनी अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली. प्रकल्पाच्या कामांमध्ये गती आणण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

त्यानंतर त्यांनी जालना शहरातील मोतीबाग चौपाटी येथे सुरू असलेल्या सुशोभिकरण कामांची पाहणी केली. कामाची गुणवत्ता, प्रगती आणि नागरिकांसाठी निर्माण करण्यात येणाऱ्या सुविधांचा त्यांनी आढावा घेतला. शहर सौंदर्यीकरणाच्या कामांमध्ये दर्जा राखण्याबाबत त्यांनी संबंधित यंत्रणेला सूचना केल्या. यानंतर जालना येथील सिरसवाडी रोडवरील जिल्हा रेशीम कोष बाजारपेठेस भेट देऊन बाजारपेठेतील सुविधा आणि कार्यपद्धतीची माहिती घेतली.

तसेच यावेळी त्यांनी उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, सह दुय्यम निबंधक कार्यालयास, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना तहसिल कार्यालय, जालना, आपले सरकार सेवा केंद्र तहसिल कार्यालय, जालना येथे भेट देऊन येथील उपलब्ध सोयी सुविधांची पाहणी केली. तसेच संबंधीत कर्मचाऱ्यांशी संवाद साधुन नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवांची देखील माहिती घेतली. तसेच त्यांनी बदनापुर येथील कृषी विज्ञान/संशोधन केंद्रास भेट दिली. कार्यालयीन कामकाज अधिक गतिमान, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

# गतीमान प्रशासनासाठी ई-ऑफिस प्रणालीसह आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा-अपर मुख्य सचिव विकास खारगे

**जालना । प्रतिनिधी**

महसूल विभाग हा समाजासाठी काम करणारा महत्त्वाचा घटक असल्याने अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी ओळखुन काम करत, गतिमान प्रशासनासाठी ई-ऑफिस प्रणाली आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा असे आवाहन महसुल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी केले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित महसुल विभागाच्या आढावा बैठकीत खारगे बोलत होते. यावेळी बैठकीस जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, उपजिल्हाधिकारी मनिषा देशपांडे, सुकेशिनी पगारे, सह जिल्हा निबंधक रामेश्वर रोडगे, जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख एम. पी. मगर, तहसिलदार छाया पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी अपर मुख्य सचिव श्री. खारगे पुढे म्हणाले की, नागरीकांना पारदर्शकपणे सेवा देण्यासाठी तसेच शासकीय कामकाजात गती आणुन कामाकाजातील प्रलंबितता कमी करण्यासाठी सर्व महसुल यंत्रणांनी ई-ऑफिस प्रणालीचा वापर करणे आवश्यक आहे. शासनाने ईज ऑफ डुइंग बिझनेसचे धोरण स्विकारले आहे. तसेच महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी आठवड्यातून एक दिवस क्षेत्रीय दौरा करावा. यामुळे नागरिकांचे प्रश्न समजावून घेण्यास मदत होते. तसेच त्यांनी दिलेल्या निवेदनांवर सकारात्मक कारवाई करावी. तसेच विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करुन, गुणवत्ता जाणून घेण्यास मदत होते. प्रशासनाने नागरिकामध्ये जावून काम करण्याचा प्रयत्न करावा. नागरिकांच्या समस्या, तक्रारींचा निपटारा करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण करुन त्यांच्या तक्रारींचा पाठपुरावा घ्यावा. कोणताही पाणंद रस्ता घेण्यापूर्वी तो अतिक्रमणमुक्त असावा, तसेच भूमी अभिलेख कार्यालयाकडून त्याचे सीमांकन करुन घ्यावे. पाणंद रस्त्यांच्या दर्जेदार कामांवर लक्ष ठेवण्याचे आणि पावसाळ्यापूर्वी जास्तीत-जास्त रस्ते पूर्ण करण्याचे नियोजन करावे. तसेच शासकीय जमिनी अतिक्रमण विरहित कशा राहतील तसेच त्यांचे व्यवस्थापन कसे करता येईल याचे नियोजन करावे. शासकीय आणि खाजगी जागेची जबाबदारी महसुल विभागाकडे आहे. याकरीता सर्व सातबारा आणि मिळकत पत्रिका व्यवस्थित सुरक्षित ठेवाव्यात. तसेच नागरिकांना अनावश्यक त्रास होऊ नये, यासाठी सर्व अर्जांची वेळेत व पारदर्शक पद्धतीने पूर्तता करण्याचे आवाहन केले.




यावेळी अपर मुख्य सचिव श्री. खारगे यांनी त्यांनी जनगणना, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान, शासकीय जमिनी वाटप व शर्तभंग प्रकरणे,पर्यायी वनीकरण,वन जमिनीचे ७/१२ अद्ययावत करणे, सिलिंग जमिन प्रकरणे, शेत व पाणंद रस्ते योजना, ई-पीक पाहणी, फेरफार नोंदी, वनहक्क दावे, अवैध गौण खनिज, घरकुलांना वाळू उपलब्ध करुन देणे आदी विषयांसह महसूल विषयक इतर कामांचाही आढावा घेतला. तसेच महसूल विभागातील प्रलंबित कामे, नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा तसेच प्रशासकीय कामकाज अधिक कार्यक्षम करण्याच्या सूचना दिल्या.

निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी सादरीकरणांद्वारे महसुल विभागातील विविध विषयांचा सविस्तर माहिती सादर केली. यावेळी बैठकीस जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, उपअधिक्षक भूमि अभिलेख, सह दूय्यम निबंधक यांची ऑनलाईन उपस्थिती होती.

## अन्नपुरवठा निरीक्षकपदी ज्ञानेश्वर महादेव हनवते यांची निवड

**मंठा । प्रतिनिधी**



मंठा तालुक्यातील स्वामी विवेकानंद विद्यालयातून बारावी शिक्षण पूर्ण केलेले तसेच जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयातून रासायनिक अभियांत्रिकी शाखेत पदवी शिक्षण घेतलेले ज्ञानेश्वर महादेव हनवते यांची अन्नपुरवठा निरीक्षक पदावर निवड झाली असून त्यांना छत्रपती संभाजीनगर विभाग मिळाला आहे.

ज्ञानेश्वर हनवते यांनी शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यापीठात प्राध्यापक म्हणून कार्य केले. शिक्षणासोबतच त्यांनी स्पर्धा परीक्षेची मेहनत सातत्याने सुरू ठेवली. त्यांच्या अथक परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर अखेर त्यांची अन्नपुरवठा निरीक्षक पदावर निवड झाली आहे.


त्यांच्या या यशामुळे मंठा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी त्यांनी प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे.

# शेअर मार्केटच्या नावाखाली कोट्यवधींचा गंडा

**रायगड । प्रतिनिधी**

शेअर मार्केटमध्ये दरमहा ४ ते ६ टक्के इतका भरघोस परतावा देण्याचे आणि प्लास्टिक कंपनीत भागीदारीचे आमिष दाखवून नाशिकमधील वकील, सरकारी नोकरदार आणि अधिकाऱ्यांसह ४० हून अधिक गुंतवणूकदारांना कोट्यवधी रुपयांचा गंडा घालणाऱ्या जानवलकर कुटुंबाचा मोठा गैरव्यवहार उघडकीस आला आहे. गेल्या वर्षभरापासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या या टोळीतील युवराज आणि यश या दोन सख्ख्या भावांना नाशिक शहर गुन्हे शाखा युनिट-२ च्या पथकाने रायगड जिल्ह्यातून अत्यंत शिताफीने अटक केली आहे.

संशयित यश सुरेश जानवलकर, युवराज सुरेश जानवलकर, सुरेश बाबुराव जानवलकर आणि संगीता सुरेश जानवलकर या संपूर्ण कुटुंबाने नाशिकमध्ये आपले जाळे विणले होते. त्यांनी 'फ्युचर स्टॉक मार्केट अनॅलिसिस' नावाची एक बनावट इन्व्हेस्टमेंट फर्म सुरू केली होती. एप्रिल २०२३ ते नोव्हेंबर २०२५ या काळात त्यांनी अनेकांना जादा परताव्याचे आमिष दाखवून आपल्या जाळ्यात ओढले. केवळ शेअर मार्केटच नव्हे, तर सिन्नरच्या माळेगाव एमआयडीसी आणि अंबड येथील त्यांच्या प्लास्टिक बॉटल बनवण्याच्या कंपनीत भागीदारी देण्याचे आमिषही त्यांनी दाखवले. या आमिषाला बळी पडून समाजातील सुशिक्षित वर्ग, वकील व शासकीय कर्मचाऱ्यांनी लाखो रुपये गुंतवले. या प्रकरणातील एका मुख्य फिर्यादीचीच तब्बल ६० लाख रुपयांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे.




गुंतवणूकदारांनी आपले पैसे परत मिळवण्यासाठी पैशांचा तगादा लावताच, या भामट्या कुटुंबाने नाशिकमधील आपले राहते घर थेट २ ते ३ वेगवेगळ्या ग्राहकांना साठेखत आणि खरेदीखत दस्तऐवज करून बेकायदेशीरपणे विकून टाकले. तिथून सर्व जमापुंजी गोळा करून संपूर्ण कुटुंबच नाशिक सोडून पसार झाले होते. याप्रकरणी नाशिकच्या अंबड पोलीस ठाण्यात आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नाशिकचे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, उपायुक्त चंद्रकांत गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखा व गुन्हे शाखा युनिट-२ चे पथक तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे संशयितांचा माग काढत होते. हे संशयित आरोपी रायगड जिल्ह्यात लपून बसल्याची गुप्त माहिती मिळताच, पथकाने खालापूर, नेरळ आणि खोपोली परिसरातून युवराज सुरेश जानवलकर (वय ३२) आणि यश सुरेश जानवलकर (वय ३०) या दोन्ही भावांना वेगवेगळ्या ठिकाणाहून ताब्यात घेतले. पोलिसांनी केलेल्या कसून चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून, न्यायालयाने त्यांना ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# संक्षिप्त

## संत तुकाराम महाराज मंदिर व संत सेवा आश्रम गोशाळेचा पायाभरणी सोहळा उत्साहात

**जालना । प्रतिनिधी**

तालुक्यातील अंतरवला येथे आज भक्तिमय वातावरणात संत तुकाराम महाराज मंदिर तसेच संत सेवा आश्रम गोशाळेच्या पायाभरणी कार्यक्रमाचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला. आंतरवाला-पारडगाव रोडवरील परिसरात उभारण्यात येणाऱ्या या धार्मिक व सामाजिक उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

संत सेवा आश्रमाची संकल्पना हाती घेतलेल्या रामप्रसाद महाराज माकोडे यांच्या पुढाकारातून हा आश्रम साकारला जात असून येथे जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचे भव्य मंदिर तसेच गोमातेच्या सेवेसाठी सुसज्ज गोशाळा उभारण्यात येणार आहे. धार्मिक कार्यासोबतच समाजप्रबोधन, अध्यात्म आणि गोसेवा यांचा संगम या आश्रमातून घडवून आणण्याचा संकल्प व्यक्त केला आहे.

पायाभरणी कार्यक्रमाचे भक्तिमय वातावरणात भूमिपूजन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी संत परंपरेचे महत्त्व अधोरेखित करत समाजात अध्यात्मिक मूल्ये टिकवून ठेवण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमास परतूर येथील नामदेवराव धुमाळ पाटील, नगरसेवक सावता काळे, भाजपाचे अर्जुन जगताप ,तुकाराम धुमाळ यांच्यासह परिसरातील अनेक नागरिक, वारकरी, भक्तगण व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी आश्रम उभारणीसाठी शुभेच्छा देत भविष्यात या ठिकाणी धार्मिक व सामाजिक उपक्रमांना चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

## प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२६ साठी नामांकने पाठवण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी**

राष्ट्रीय पातळीवरील अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या, प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार (पीएमआरबीसी) २०२६ साठी, नामांकने पाठवावीत, असे आवाहन सरकारने केले आहे. देशभरातल्या मुलांना, त्यांच्या अद्वितीय कामगिरीसाठी हे पुरस्कार दरवर्षी प्रदान केले जातात. शौर्य, क्रीडा, सामाजिक शास्त्रे, विज्ञान आणि तंत्रज्ञान, पर्यावरण आणि कला-संस्कृती अशा विविध क्षेत्रात, अद्वितीय, उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मुलांचा, हे पुरस्कार देऊन, सन्मान केला जातो.

पाच वर्षे वयाच्या पुढचे आणि १८ वर्षांपर्यंतचे (३१ जुलै, २०२६ रोजी) कोणतेही मुले/मुली या पुरस्कारासाठी पात्र आहेत. मात्र, ते भारतीय नागरिक आणि भारतात वास्तव्य करणारे असणे आवश्यक आहे.

नागरिकांनी मानांकने केवळ राष्ट्रीय पुरस्कार पोर्टल https://awards.gov.in वरुनच भरावीत. स्वयं-नामांकन आणि कोणीही केलेल्या शिफारसी स्वीकारल्या जातीत. ऑनलाइन आवेदने पाठवण्याची शेवटची तारीख ३१ जुलै, २०२६ आहे. अधिक सविस्तर माहितीसाठी, कृपया राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलला भेट द्या. (https://awards.gov.in).

## ग्रंथालयाच्या नवीन इमारतीचे काम निर्धारित वेळेत पूर्ण करा - मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील विद्यार्थी, संशोधक आणि वाचनप्रेमींसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने उभारण्यात आलेल्या राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाच्या नवीन इमारतीची कामे निर्धारित वेळेत व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाच्या नवीन इमारत बांधकामाची मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी पाहणी केली यावेळी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, महाराष्ट्र राज्य कला संचालनालयाचे संचालक डॉ. किशोर इंगळे, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाचे संचालक विनोद दांडगे, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, बांधकाम विभागाचे अधिकारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड,
मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - **MHMAR/25/A1224**

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com **PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224**